<u>वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ मध्ये सुधारणा.</u>

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: धोरण २०१७/प्र.क्र.६/टेक्स-५**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दि. २१ डिसेंबर, २०१८.

**<u>वाचा</u>** - १) शा. नि. क्रमांक: धोरण २०१७/प्र.क्र.६/टेक्स-५ दि. १५ फेब्रुवारी, २०१८.
२) शा. शुध्दीपत्रक क्रमांक: धोरण २०१७/प्र.क्र.६/टेक्स-५ दि.१६ मार्च, २०१८

**<u>प्रस्तावना -</u>**

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. याबाबत शासन आता खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ मधील मुद्दा क्र. ३.३, ३.४, ३.१२, ७.३ व ७.४ खालील प्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत.

**मुद्दा क्र. ३. व्याख्या -**

**३.३. विस्तारीकरण प्रकल्प** - अस्तित्वातील प्रकल्पाने मागील आर्थिक वर्षीच्या स्थापीत यंत्रसामुग्रीच्या पुस्तकी किंमतीच्या (Book Value of machinery) १० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त यंत्रसामुग्री स्थापीत केल्यास सदर गुंतवणूकीस विस्तारीकरण किंवा विविधीकरण/ आधुनिकीकरण मानण्यात येईल. सदर विस्तारीकरण आणि /किंवा विविधीकरण/ आधुनिकीकरण हे पुढील / मागील प्रक्रीयेसह (forward - Backward) असेल.

**३.४ स्थिर ढोबळ भांडवली गुंतवणूक** - विस्तारीकरण/विविधीकरण/आधुनिकिकरण करण्यासाठी यंत्रसामुग्रीमधील गुंतवणूक आणि/ किंवा वित्तीय संस्था/बँकेकडून आर्थिक सहाय्य मंजूर झालेली तसेच स्व-अर्थसूहाय्याने स्थापन झालेल्या प्रकल्पातील गुंतवणूक.

**३.१२ कंपोझीट युनिट** - सदर व्याख्या वगळण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. ७.३ मध्ये ७.३.३ नंतर ७.३.४ खालील प्रमाणे अंतर्भूत करण्यात येत आहे.**

**७.३. ४ वस्त्रोद्योग प्रकल्पांना वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अथवा वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ चा लाभ घेणेबाबत विकल्प देणे**

दि. १.८.२०१७ ते दि. १४.२.२०१८ या कालावधीत ज्या प्रकल्पांना दीर्घ मुदती कर्ज मंजूर झाले असेल किंवा स्व-अर्थसहाय्यीत प्रकल्पाबाबत ज्या प्रकल्पांनी यंत्रसामुग्रीच्या खरेदीचे आदेश दिलेले असतील अशा प्रकल्पांना वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ मधील किंवा वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ मधील योजनांचा लाभ देण्यात येईल. या कालावधीतील संबधीत प्रकल्पांना विकल्प देण्यात येईल.

**मुद्दा क्र. ७.४ च्या स्तंभ ३ मध्ये व पुढील व मागील प्रक्रीया (Forward Backward Integration) च्या रकान्यामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.**

स्तंभ ३ मधील कंपोझिट युनिट व त्यासाठी असलेली सर्व अनुदाने रद्द करण्यात येत आहे. त्याऐवजी पुढील व मागील प्रक्रीया (Forward Backward Integration) साठी देय ५ टक्के अतिरीक्त अनुदान राज्यातील सर्व विभागातील वस्त्रोद्योग प्रकल्पांना लागू करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. ७.४ नंतर ७.४.अ. खालील प्रमाणे अंतर्भूत करण्यात येत आहे.**

**७.४.अ. वस्त्रोद्योग प्रकल्पांनी यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी वापरलेल्या निधीवर भांडवली अनुदान देण्याबाबत.**

वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ मधिल व्याज अनुदाना ऐवजी भांडवली अनुदान योजने अंतर्गत बँक सहाय्यीत प्रकल्पांनी यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी स्व-निधीतून वापरलेल्या रकमेवरही भांडवली अनुदान देण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१२२११६४१३५५१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Nilkantha Patne

Digitally signed by Atul Nilkantha Patne
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-operation, Marketing and Textiles, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dbe47489f41f6ba7b373916e4ff1397bb87658b79c59c01cd690741a79b94b6f, cn=Atul Nilkantha Patne
Date: 2018.12.21 16:45:39 +05'30'

**( अतुल पाटणे )**
सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

१. मा.राज्यपालांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,महाराष्ट्र राज्य
३. मा. मंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७. मा.खासदार (सर्व)
८. मा.आमदार (सर्व)
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
१०. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
११. संचालक, (वस्त्रोद्योग) वस्त्रोद्योग संचालनालय, म.रा.नागपूर
१२. संचालक (रेशीम) रेशीम संचालनालय, म. रा. नागपूर
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. महालेखापाल, (लेखा व लेखा अनुज्ञेयता/लेखा परिक्षा ) महाराष्ट्र राज्य १ /२, मुंबई, नागपूर
१५. संबंधित बँका-TUFS Cell
१६. निवड नस्ती (टेक्स-५).